क्रमांक : १९३८/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ३१ जानेवारी, २०२५.

**संदर्भ :-** १) सा.प्र.वि.शा.नि.क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.१ ऑगस्ट, २०१९
२) या सचिवालयाचे ज्ञापन क्र.२२३९१/क-१, दि.१३ नोव्हेंबर, २०२४.

**:: कार्यालयीन आदेश ::**

या सचिवालयातील प्रधान सचिव आणि सचिव या पदावरील नियुक्ती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (सेवाप्रवेश आणि सेवेच्या शर्ती) नियम, १९७३ मधील नियम ५ मध्ये नमूद केल्यानुसार करण्यात येते. या व्यतिरिक्त 'गट-अ' संवर्गातील रिक्त असलेल्या सह सचिव आणि उप सचिव या पदांवर आवश्यक असणारी अर्हता धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांना पदोन्नती / पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयातील एकत्रित मार्गदर्शक तत्वे व या सचिवालयातील सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती यातील विहित नियमांनुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यास शिफारस करण्याकरिता **आस्थापना मंडळ** या आदेशान्वये नव्याने गठीत करण्यात येत आहे. त्यानुसार आस्थापना मंडळामधील सदस्य अधिकारी खालीलप्रमाणे राहतील :-

**आस्थापना मंडळ**

| गट | आस्थापना मंडळातील अधिकारी / सदस्य | |
|---|---|---|
| 'गट-अ' (राजपत्रित) (६ व्या वेतन आयोगानुसार ज्या पदांचे ग्रेड वेतन रु.७६००/- किंवा त्यापेक्षा जास्त तथापि रु.१०,०००/- पेक्षा कमी) | श्री.जितेंद्र भोळे, सचिव-१ (का.) | अध्यक्ष |
| | श्रीमती पुनम हे. ढगे, उप सचिव | सदस्य |
| | श्रीमती सिमा स.तांबे, अवर सचिव | सदस्य |
| | श्री.घननीळ ज्ञा.देबडवार, अवर सचिव | सदस्य |
| | उप सचिव/अवर सचिव (क-१ आस्थापना) | सदस्य सचिव |

..२/-

सदरहू आस्थापना मंडळाचे कार्यक्षेत्र :-

- 'गट-अ' संवर्गातील रिक्त असलेल्या व आस्थापना मंडळाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या पदांवर आवश्यक असणारी अर्हता धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे प्रस्ताव विचारात घेणे व संदर्भाधीन शासन निर्णयातील एकत्रित मार्गदर्शक तत्वे व या सचिवालयातील सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती यातील विहित नियमांनुसार पदोन्नतीसाठी पात्र अधिकाऱ्यांची निवडसूची तयार करुन नियुक्ती प्राधिकाऱ्यास पदोन्नतीसाठी शिफारस करणे.
- मानीव दिनांकाचे प्रस्ताव विचारात घेणे व सेवा प्रवेश नियमाच्या तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/मार्गदर्शक सूचना विचारात घेवून पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्यासाठी नियुक्ती प्राधिकाऱ्यास शिफारस करणे.
- आस्थापना मंडळाच्या निवड सूचीच्या व अहवालाच्या अनुषंगाने विविध संवर्गातील पदोन्नती / मानीव दिनांक देण्यासंदर्भातील प्रस्ताव "क-१ (आस्थापना)" कक्षामार्फत नियुक्ती प्राधिकारी यांच्या अंतिम निर्णयार्थ सादर करण्यात येतील.

आदेशानुसार,

(सुभाष नलावडे)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) सचिव-१ (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
४) सचिव-२ (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) आस्थापना मंडळातील अधिकारी/ सदस्य
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी.
७) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (सदरहू आदेश या सचिवालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.)
८) निवडसूची